अधिसूचना

क्रमांक : ११७/२०२१ दिनांक : ११.११.२०२१

विषय : संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये उशिरा प्रवेशाची प्रक्रिया पुर्ण करण्याची अंतिम तिथीबाबत..

संदर्भ : १. विद्यापीठ अधिसूचना क्र.७९/२०२१, दि. ७.८.२०२१
शैक्षणिक नियमिकाé शैक्षणिक वर्ष २०२१-२२
२. विद्यापीठ अधिसूचना क्र.९५/२०२१, दि. ८.१०.२०२१
३. विद्यापीठ अधिसुचना क्र. १००/२०२१,दि.२०/१०/२०२१
४.विद्यापीठ अधिसुचना क्र. १०९/२०२१,दि.३०/१०/२०२१

ज्याअर्थी, कोव्हीड-१९ च्या वाढत्या प्रादुर्भावामुळे २०२०-२१ शैक्षणिक वर्ष प्रभावित झाला आहे व त्याचा परिणाम शैक्षणिक वर्ष २०२१-२२ वर झाला आहे व अध्यादेश क्र.२ च्या परिच्छेद ३ नुसार कार्यवाही होऊ शकली नाही, यासंबंधात विद्यापीठाने संदर्भीकीत क्र.२ वरील अधिसूचना क्र. ९५/२०२१, दि. ८.१०.२०२१ प्रसिध्द केली होती. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी (विद्यापीठ शैक्षणिक विभाग व ज्या अभ्यासक्रमाचे प्रवेश केंद्रीय प्रवेश पध्दतीने होतात असे अभ्यासक्रम वगळून) संलग्नित महाविद्यालयातील इतर सर्व अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांची उशिरा प्रवेश प्रक्रिया दि. १९ सप्टेंबर, २०२१ पासून सोमवार दि. १८ ऑक्टोंबर, २०२१ पर्यंत पुर्ण करण्याची परवानगी मा.कुलगुरुंनी प्रदान केली होती.त्यानंतर विद्या परीषदेने दि. १३.१०.२०२१ च्या सभेत उशिरा प्रवेश प्रक्रियेला मुदत वाढ देण्याबाबत निर्णय घेतला होता. त्यानुसार उशिरा प्रवेश प्रक्रिया दि. १८ ऑक्टोंबर, २०२१ ऐवजी दि. ३० ऑक्टोंबर, २०२१ पर्यंत पुर्ण करावयाचे वरील संदर्भ क्र.३ च्या अधिसुचना प्रमाणे अधिसुचित करण्यात आले होते.

आणि

ज्याअर्थी, मा.कुलगुरुंनी विद्या परिषदेच्या वतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ च्या कलम १२(७) अंतर्गत उशिरा प्रवेश प्रक्रिया दि. ३० ऑक्टोंबर, २०२१ ऐवजी दि. १२ नोव्हेंबर, २०२१ पर्यंत पुर्ण करावयाचे वरील संदर्भ क्र.४ च्या अधिसुचना प्रमाणे अधिसुचित करण्यात आले आहे.

आणि

ज्याअर्थी,मा.कुलगुरुंनी परिक्षांचे निकाल व इतर बाबीवर विचार केल्याने, सदर उशिरा प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन अंतिम तिथी दिनांक २०/११/२०२१ पर्यंत वाढवून देण्याचे निर्देश दिले आहे.

यानुसार सर्व संबंधितांच्या माहिती व कार्यवाहीसाठी अधिसुचित करण्यात येते की, सर्व संलग्नित महाविद्यालयांनी सत्र २०२१-२२ करिता उशिरा प्रवेश प्रक्रिया (विद्यापीठ शैक्षणिक विभाग व ज्या अभ्यासक्रमाचे प्रवेश केंद्रिय पद्धतीने होतात ते वगळून), दि.२०/११/२०२१ पर्यंत पुर्ण करावी. यानंतर यासंबंधात तारीख वाढवून देण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

स्वा/-
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,

*****